आर्थिक ताण सहन करावा लागतो. परंतु आज व्यक्तीने जर आर्थिक स्त्रोतांचे योग्य पद्धतीने नियोजन केले तर त्याला अचानक येणाऱ्या आरोग्यविषयक खर्चाच्या समस्येचे नियोजन करता येऊ शकते तरी आरोग्य विमा विकत घेऊन व्यक्ती त्याच्या आरोग्याचे किंवा होणाऱ्या आकस्मिक खर्चाचे नियंत्रण करू शकतो.

आरोग्य विमा हा एक प्रकारचा असा विमा आहे ज्यामध्ये आपल्याला आरोग्याची काळजी घेण्यासाठी येणाऱ्या खर्चाची जबाबदारी विमा कंपनीला दिली जाते त्या बदल्यात कंपनीला एक ठराविक रक्कम प्रिमियम किंवा शुल्क म्हणून दिले जाते. आज बाजारामध्ये विविध कंपन्यांमार्फत आरोग्य विमा दिला जातो त्यामध्ये स्टार हेल्थ, एसबीआय हेल्थ, एचडीएफसी, युनियन डायची इत्यादी कंपन्या आहेत. त्यांची विविध आरोग्य सेवा पुरविणाऱ्या हॉस्पिटलची श्रृंखला स्थापित झालेली असते. विमा घेतलेल्या व्यक्तीने या कंपनीकडून विमा घेतला तर त्यांना या हॉस्पिटलमध्ये कॅशलेस सुविधा भेटू शकते त्यांना उपचारासाठी पैसे खर्च करावे लागत नाही तसेच ज्या ठिकाणी या सुविधा नसतील तेथे वैद्यकीय खर्च केल्यानंतर व्यक्तीला त्याच्या बिलाची किंवा खर्चाची प्रतिपूर्ती करून दिली जाते. तसेच आयकर भरणाऱ्या व्यक्तीला या वैद्यकीय खर्चाची आयकर मध्ये 80(D) अंतर्गत सूट देखील मिळते. प्रस्तुत संशोधन करण्यामागचा हेतू म्हणजे आजच्या या 21व्या शतकात ज्ञानाचा प्रसार वेगाने होत आहे आणि संचार क्षेत्रातील क्रांतीमुळे व इंटरनेटच्या सर्वत्र उपलब्धतेमुळे विद्यार्थ्यांना सर्वच बाबतीतली माहिती सहज मिळत आहे तरी प्रस्तुत संशोधन हे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक विमा बाबत जाणीव जागृती कशी आहे हे जाणून घेण्यासाठी हा संशोधन विषय हाती घेण्यात आला आहे.

**समस्या विधान:-**

शिरपूर तालुक्यातील पदवी स्तरावरील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या अंतिम वर्षाला प्रवेशित विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविमा संदर्भातील जाणीव जागृतीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**उद्दिष्टे:-**

1. पदवी स्तरावरील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या अंतिम वर्षाला प्रवेशित विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविमा संदर्भातील जाणीव जागृतीचा अभ्यास करणे.
2. पदवी स्तरावरील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या अंतिम वर्षाला प्रवेशित विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविमा संदर्भातील जाणीव जागृतीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**परिकल्पना:-**

1. पदवी स्तरावरील कला व वाणिज्य शाखेच्या अंतिम वर्षाला प्रवेशित विद्यार्थ्यांमधील आरोग्यविमा संदर्भातील जाणीव जागृतीचा मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.
2. पदवी स्तरावरील कला व विज्ञान शाखेच्या अंतिम वर्षाला प्रवेशित विद्यार्थ्यांमधील आरोग्यविमा संदर्भातील जाणीव जागृतीचा मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.
3. पदवी स्तरावरील वाणिज्य व विज्ञानशाखेच्या अंतिम वर्षाला प्रवेशित

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

4. विद्यार्थ्यांमधील आरोग्यविमा संदर्भातील जाणीव जागृतीचा मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.

**संशोधनाची कार्यपद्धती :**

| | |
|---|---|
| **संशोधन पद्धती** | वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धती |
| **जनसंख्या** | शिरपूर तालुक्यातील पदवी स्तरावरील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या अंतिम वर्षाला प्रवेशित सर्व विद्यार्थी |
| **न्यादर्श** | लॉटरी व सहेतुक नमुना निवड पद्धती - पदवी स्तरावरील कला शाखेतील 30 + विज्ञान शाखेतील 30 + वाणिज्य शाखेतील 30 = 90 विद्यार्थ्यांची निवड |
| **संशोधन साधने** | **आरोग्य विमा विषयक जाणीव जागृती शोधिका**- विधाने- 20, प्रतिसाद- सहमत, असहमत व सांगता येत नाही. |
| **संख्याशास्त्रीय परिमाणे** | मध्यमान, प्रमाण विचलन व 't' मूल्य |

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन:-**

प्रस्तुत संशोधनात, पदवी स्तरावरील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या अंतिम वर्षाला प्रवेशित विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविमा संदर्भातील जाणीव जागृतीचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी स्वनिर्मित चाचणी देण्यात आली होती. या चाचणीला विद्यार्थ्यांनी दिलेले प्रतिसादाचे विश्लेषण करून पुढील प्रमाणे निष्कर्ष मांडण्यात आले.


<table>
<tr><th>पदवी स्तरावरील विद्यार्थी</th><th>N</th><th>M</th><th>SD</th><th>Table ‘t’ value</th><th>Obtained ‘t’ value</th><th>Decision</th></tr>
<tr><td>कला शाखा</td><td>30</td><td>29.40</td><td>3.25</td><td rowspan="6">2.00</td><td rowspan="2">4.68</td><td rowspan="2">त्याग</td></tr>
<tr><td>वाणिज्य शाखा</td><td>30</td><td>33.25</td><td>3.12</td></tr>
<tr><td>कला शाखा</td><td>30</td><td>29.40</td><td>3.25</td><td rowspan="2">1.49</td><td rowspan="2">स्वीकार</td></tr>
<tr><td>विज्ञान शाखा</td><td>30</td><td>30.66</td><td>3.29</td></tr>
<tr><td>वाणिज्य शाखा</td><td>30</td><td>33.25</td><td>3.12</td><td rowspan="2">3.12</td><td rowspan="2">त्याग</td></tr>
<tr><td>विज्ञान शाखा</td><td>30</td><td>30.66</td><td>3.29</td></tr>
</table>

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article




**विश्लेषण व अर्थनिर्वचन:-**

**परिकल्पना 01:** परिकल्पना 01: स्वाधीनता मात्रा (58) साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य 2.00 आहे. प्राप्त मूल्य 4.68 असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, पदवी स्तरावरील कला व वाणिज्य शाखेच्या अंतिम वर्षाला प्रवेशित विद्यार्थ्यांमधील आरोग्यविमा संदर्भातील जाणीव जागृतीचा मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येतो. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा मध्यमान गुणांक हा कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या मध्यमान गुणांकापेक्षा अधिक आहे. यावरून असे म्हणता येईल की, वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांमध्ये कला शाखेतील विद्यार्थ्यांपेक्षा आरोग्यविमा विषयक जाणीव जागृती अधिक दिसून येते.

**परिकल्पना 02:** स्वाधीनता मात्रा (58) साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य 2.00 आहे. प्राप्त मूल्य 1.49 असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, पदवी स्तरावरील कला व विज्ञान शाखेच्या अंतिम वर्षाला प्रवेशित विद्यार्थ्यांमधील आरोग्यविमा संदर्भातील जाणीव जागृतीचा मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही. कला व विज्ञान वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा मध्यमान गुणांकात सार्थ फरक दिसून येत नाही. यावरून असे म्हणता येईल की, कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांमधील आरोग्यविमा विषयक जाणीव जागृती सारखीच दिसून दिसून येते.

**परिकल्पना 03:** स्वाधीनता मात्रा (58) साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य 2.00 आहे. प्राप्त मूल्य 3.12 असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, पदवी स्तरावरील वाणिज्य व विज्ञान शाखेच्या अंतिम वर्षाला प्रवेशित विद्यार्थ्यांमधील आरोग्यविमा संदर्भातील जाणीव जागृतीचा मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023

OPEN ACCESS

Original Research Article

येतो. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा मध्यमान गुणांक हा विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या मध्यमान गुणांकापेक्षा अधिक आहे. यावरून असे म्हणता येईल की, वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांपेक्षा आरोग्यविमा

विषयक जाणीव जागृती अधिक दिसून येते.

**निष्कर्ष व चर्चा:**

1. पदवी स्तरावरील कला व वाणिज्य शाखेच्या अंतिम वर्षाला प्रवेशित विद्यार्थ्यांमधील आरोग्यविमा संदर्भातील जाणीव जागृतीचा मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येतो. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांमध्ये कला शाखेतील विद्यार्थ्यांपेक्षा आरोग्यविमा विषयक जाणीव जागृती अधिक दिसून येते.
2. पदवी स्तरावरील कला व विज्ञान शाखेच्या अंतिम वर्षाला प्रवेशित विद्यार्थ्यांमधील आरोग्यविमा संदर्भातील जाणीव जागृतीचा मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही. कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांमधील आरोग्यविमा विषयक जाणीव जागृती सारखीच दिसून दिसून येते.
3. पदवी स्तरावरील वाणिज्य व विज्ञानशाखेच्या अंतिम वर्षाला प्रवेशित विद्यार्थ्यांमधील आरोग्यविमा संदर्भातील जाणीव जागृतीचा मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येतो. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांपेक्षा आरोग्यविमा विषयक जाणीव जागृती अधिक दिसून येते.

**संदर्भग्रंथसूची:-**

भितांडे, वि. रा. (२००७). *शैक्षणिक संशोधन पद्धती (प्रथम आवृत्ती)*. पुणे: नित्यनूतन प्रकाशन.

पंडित, बी. बी. (२००७). *शिक्षणातील संशोधन.* (प्रथम आवृत्ती). पुणे: नित्यनूतन प्रकाशन.

मुळे व उमाठे. (१९९८). *शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे.* (तिसरी आवृत्ती). नागपूर: विद्या बुक्स प्रकाशन.

पारसनीस, न) .रा .1990). *प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र*. पुणे : .:नूतन प्रकाशन

करंदीकर, सुरेश) .2003). *शैक्षणिक मानसशास्त्र*. कोल्हापूर . फडके प्रकाशन

***Cite This Article:***

Shri. Khekade G.M. (2023 **पदवी स्तरावरील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या अंतिम वर्षाला प्रवेशित विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविमा संदर्भातील जाणीव जागृतीचा तुलनात्मक अभ्यास**. In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal: Vol. XII (Number VI, pp. 81–85). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.10475260